माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- 3803 दिनांक :- 6/12/18

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.०५.१२.२०१८

१. अपिलकर्ता श्री नारायण शंकर वांभिरे,
राहणार :- स.नं.८८/५ ब, गुजरात कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११०३८.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता,कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्री नारायण शंकर वांभिरे
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री नारायण शंकर वांभिरे यांनी दिनांक २०/१०/२०१८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका यांचेकडे कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडील झाडणकामाचे टेंडर बाबत व आरोग्य खात्याकडील अधिकारी कर्मचाऱ्यांबाबत माहिती मिळणकामी अर्ज केला होता.

अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे अंदाजे ३०५ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रूपये प्रमाणे एकूण ६१०/- रू. शुल्क चलनाव्दारे भरून सदरची माहिती उपलब्ध करुन देणेत येईल असे पत्र जा.क्र.३३४५ दि.१२.११.१८ अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २०/१०/२०१८ | १९/११/२०१८ | १२/११/२०१८ | निरंक | निरंक |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे – अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ११/१२/२०१८ | २०/११/२०१८ | होय | – | २६/११/२०१८ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. ०५/१२/२०१८ रोजी सायंकाळी ०४.३० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडील झाडणकामाचे टेंडर बाबत व आरोग्य खात्याकडील अधिकारी कर्मचाऱ्यांबाबत माहिती मिळणकामी अर्ज केला होता. | कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे अंदाजे ३०५ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रूपये प्रमाणे एकूण ६१०/- रू. शुल्क चलनाव्दारे भरून सदरची माहिती उपलब्ध करुन देणेत येईल असे पत्र जा.क्र.३३४५ दि.१२.११.१८ अन्वये कळविले |

## विवेचन

अपिलकर्ता श्री नारायण शंकर वांभिरे, यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिनांक २०/१०/२०१८ रोजी अर्ज कार्यालयाकडे दाखल झाला.

अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे अंदाजे ३०५ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रूपये प्रमाणे एकूण ६१०/- रू. शुल्क चलनाव्दारे भरून सदरची माहिती उपलब्ध करुन देणेत येईल असे पत्र जा.क्र.३३४५ दि.१२.११.१८ अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.

जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेले दि.१२/११/२०१८ रोजीचे पत्र अद्याप पर्यंत(दि.०५/१२/२०१८) प्राप्त न झाले बाबत अपिलकर्त्यांने सांगितले. तरी कार्यालयाकडील उपलब्ध माहिती विनामुल्य देणेत यावी असे अपिलकर्त्यांने सांगितले.

## -: आदेश :-

कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे १५०/- पृष्ठ्ये अपिलकर्त्यास विनामूल्य देणेत यावेत व उर्वरित पृष्ठ्यांचे चलनाद्वारे शुल्क भरूण माहिती अपिलकर्त्यास उपलब्ध करून देणेत यावी.

प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

5/12/18

(रविंद्र घोरपडे)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त,
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाणः ०५/१२/२०१८,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-१. अपिलकर्ता श्री नारायण शंकर वांभिरे,
राहणार :- स.नं.८८/५ ब, गुजरात कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११०३८.

२. श्री अनिल सोनवणे,
जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी.......